# देशोन्नती
वैचारिक क्रांतीचा अग्रदूत

अकोला बुधवार, दि. २७ ऑक्टोबर २०२१


## पाकिस्तानमधील चीनच्या गुंतवणुकीत घट



**कराची :** सेंट्रल बँक ऑफ पाकिस्तानने देशातील चिनी गुंतवणुकीत घट होत असल्याची आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. दुसरीकडे अमेरिकन गुंतवणूक वाढत असल्याचेही यामधून समोर आले आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत (जुलै-सप्टेंबर) पाकिस्तानातील चिनी गुंतवणूक ही १० कोटी डॉलर इतकी होती, तर गेल्या वर्षी हीच रक्कम २० कोटी डॉलर इतकी होती. पाकिस्तानात चीनची सर्वात मोठी गुंतवणूक चीन-पाकिस्तान इकोनॉमिक कॉरिडोर आहे. याठिकाणी



मंगळवारी एआयसीसीच्या बैठकीसाठी पंजाब काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नवज्योतसिंग सिद्धू उपस्थित होते.

### जागतिक हवामान संस्थेचा अहवाल: सर्वाधिक फटका हा आशियातील देशांना

# हवामानातील बदलाचा भारताला ६५ हजार कोटींचा फटका

वृत्तसंस्था...

**जिनिव्हा:** जागतिक हवामान संस्थेने २०20 वर्षासाठीचा जागतिक हवामानातील बदलांचा आढावा घेणारा अहवाल प्रकाशित केला आहे. यामध्ये जागतिक पातळीवर तापमानात झालेली वाढ, हरितगृह वायुंचे वाढलेले प्रमाण आणि यामुळे जगावर झालेले परिणाम याबाबत भाष्य केले आहे. हवामानातील बदलामुळे नैसर्गिक आपत्तींचा सर्वाधिक फटका हा आशियातील देशांना बसल्याचे अहवालात नमूद केले आहे. एकट्या भारताला ६५ हजार कोटींचा फटका बसल्याचेही यामध्ये स्पष्ट करण्यात आले.

जागतिक हवामान संस्थेच्या अहवालानुसार जागतिक पातळीवर झालेल्या हवामानातील बदलांचा सर्वात मोठा फटका हा चीन आणि भारताला बसला आहे. विविध स्वरूपाची चक्रीवादळ, अतिवृष्टी, यामुळे उद्भवलेली पूर परिस्थिती, याविरोधातील परिस्थिती म्हणजे दुष्काळ यामुळे जगात



विशेषतः आशियाला २०२० मध्ये अक्षरशः झोडपून काढले. यामुळे पिकांचे तसेच मालमत्तेचे झालेले नुकसान झाले, अनेकांचे बळी गेले. जागतिक हवामान संस्थेच्या अहवालानुसार भारताला २०२० मध्ये अंदाजे ८७ अब्ज डॉलर्सचा म्हणजेच सुमारे ६५,३५२ कोटी रुपयांचा फटका बसला आहे. तर सर्वाधिक फटका हा चीनला सुमारे २३७ अब्ज डॉलर्सचा बसला आहे. जपानला ८३, दक्षिण कोरियाला २४, पाकिस्तानला १५ तर थायलंडला १२, बांगलादेशला ११ अब्ज डॉलर्सचा फटका बसला असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

जगात विशेषतः आशियात आलेल्या नैसर्गिक आपत्तीला, संकटांना जागतिक पातळीवर तापमानात झालेली वाढ कारणीभूत असल्याचे जागतिक हवामान संस्थेने स्पष्ट केले आहे. हरितगृह वायूचे वाढलेले प्रमाण कारणीभूत ठरले आहे.

> संयुक्त राष्ट्राची 'जागतिक हवामान बदल' याबाबतची एक मोठी परिषद स्कॉटलंड इथल्या ग्लासगो इथे पुढील आठवड्यात होत आहे. जागतिक पातळीवरच्या हवामान बदलाबाबत साधकबाधक चर्चा या परिषदमध्ये होणार आहे, हवामान बदलाबाबत नवीन लक्ष्य निश्चित केले जाण्याची शक्यता आहे. या परिषदला जेमतेम एक आठवडा असताना जागतिक हवामान संस्थेने २०२० चा अहवाल प्रसिद्ध केला आहे हे विशेष.

२०२० मध्ये जगात टाळेबंदी होती, कोरोना महामारी होती. असे असताना देखील हरितगृह वायूचे प्रमाण वाढल्याचे अहवालात सांगितले आहे. यामुळे गेल्या ४० वर्षातील सर्वात जास्त सरासरी तापमान राहिलेले वर्ष म्हणून २०२० या वर्षाची ओळख झाल्याचे या अहवालात म्हटले आहे.



नवी दिल्ली: येथील पक्षकार्यालयात मंगळवारी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी कार्यकारिणीच्या बैठकीला संबोधित केले.

## शिस्त व ऐक्याने पक्ष मजबूत करा

### काँग्रेसची बैठक: काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांचे आवाहन

वृत्तसंस्था...

**नवी दिल्ली:** आगामी काळात होणाऱ्या पाच राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिल्लीमध्ये आज सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी पक्षाच्या नेत्यांना संबोधित करताना, भाजपा आणि आरएसएसशी लढण्यासाठी पक्षामध्ये 'शिस्त आणि ऐक्याची अत्यंत गरज' असल्याचे म्हटले. याद्वारे पक्ष संघटना मजबुत करा, असे आवाहनही त्यांनी केले. या बैठकीस प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, प्रदेश प्रभारी आणि सरचिटणीस यांची उपस्थिती होती. शिवाय, राहुल गांधी व प्रियंका गांधींसह काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची देखील बैठकीस हजेरी होती. काँग्रेसचे सरचिटणीस, प्रदेशाध्यक्ष आणि इतर नेत्यांशी बोलताना सोनिया गांधी मंगळवारी म्हणाल्या, 'आपण भाजपा, आरएसएसच्या वैचारिक मोहिमेशी लढा दिला पाहिजे. जर आपल्याला ही लढाई जिंकायची असेल तर लोकांसमोर त्यांचे खोटे उघड केले पाहिजे.' एआयसीसी देशासमोरील समस्यांवर जवळजवळ दररोज महत्त्वपूर्ण आणि तपशीलवार विधाने जारी करते, पण ब्लॉक आणि जिल्हा स्तरावरील आमच्या तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत ते पोहचत नाहीत, असा

> मी शिस्त आणि एकजुटीच्या नितांत आवश्यकतेवर पुन्हा जोर देऊ इच्छिते. आपल्यापैकी प्रत्येकासाठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे संघटना मजबूत करणे ही आहे. त्यासाठी वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवणे आवश्यक आहे. यातच सामूहिक आणि वैयक्तिक यश दडलेले आहे, असेही सोनिया गांधी म्हणाल्या.

## थोडक्यात

### रशियन हॅकर्सचा १४० अमेरिकन कंपन्यांवर हल्ला

**मॉस्को:** रशियन हॅकर्सनी अमेरिकन कंपन्यांना लक्ष्य करण्याचे सत्र सुरूच ठेवले असून अमेरिकेतील सुमारे १४० कंपन्यांवर सायबर हल्ले करण्यात आल्याचे वृत्त आहे. अमेरिकन सायबर तज्ञांनी रशियन गुप्तचर संस्थाकडून मोठ्या सायबर हल्ल्याचा इशारा सरकारी विभाग, कार्पोरेट, कम्प्युटर नेटवर्क क्षेत्र आणि मायक्रोसॉफ्टच्या अधिकाऱ्यांना दिला होता.

### अमित शाह यांच्या काश्मिर दौऱ्यात वाढ

**श्रीनगर:** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जम्मू-काश्मीरच्या आपल्या तीन दिवसांच्या दौऱ्यात थोडी वाढ केली. पुलवामाच्या लेथपुरामध्ये केंद्रीय रिझर्व्ह पोलीस दलाच्या शिबिरातच त्यांनी आपला सोमवारी रात्रीचा मुक्काम ठोकला. तसेच कोणत्याही सुरक्षेविना श्रीनगर भागात अमित शाह यांनी भाषण केले आहे.

### हरियाणाचे गृहमंत्री अनिल विज यांचे वादग्रस्त वक्तव्य

**चंदीगड:** जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती याचा डीएनए दोषपूर्ण आहे आणि त्यांनी स्वतः भारतीय असल्याचे सिद्ध करावे लागेल, असे वादग्रस्त वक्तव्य हरियाणाचे गृहमंत्री अनिल विज यांनी आज केले. मेहबुबा मुफ्ती यांच्या कालच्या ट्विटला प्रत्युत्तर देताना अनिल विज असे म्हणाले.

### आरोपांमुळे वाईट वाटले

**इस्लामाबाद:** पंजाबचे माजी मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदरसिंग यांनी पाकिस्तानी पत्रकार अरुसा आलम यांच्यासोबतच्या मैत्रीला इतरांनी वेगळा रंग दिल्याचे म्हणत संकुचित वृत्तीचे लोक असे करत असल्याचे म्हटले आहे.

## अफगाणींजवळ सापडले भारताचे नकली आधार कार्ड

**काठमांडू :** भारतीय सीमा सोनौलीच्या मार्गाने नेपाळमध्ये दाखल झालेल्या अकरा अफगाणी नागरिकांना काठमांडूजवळ अटक करण्यात आली. त्यांच्याजवळून भारताचे नकली आधार कार्ड जप्त करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.

या माहितीमुळे भारत-नेपाळ सीमेवर तैनात सर्व सुरक्षा संस्थांनी तातडीने आपापल्या स्तरावर प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. नेपाळ पोलिसांचे प्रमुख धीरज प्रताप सिंह यांनी सांगितले की, सीआयबीने सोमवारी सकाळी या अकरा जणांना सिनामंगलमधील एका घरातून अटक केली. त्यातील सहा जणांकडे भारताचे आधार कार्ड सापडले. मात्र, ते बनावट असल्याचे लक्षात आले. अफगाणिस्तानात तालिबान सत्तेवर आल्यानंतर हे अकरा जण तिथून बाहेर पडले आणि भारतामार्गे नेपाळमध्ये आले.

## यूपीएससीमार्फत १४ नोव्हेंबरला घेण्यात येणार परीक्षा; प्रवेशपत्र ऑनलाइन उपलब्ध

वृत्तसंस्था...

**पुणे :** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) वतीने घेण्यात येणारी संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा (सीडीएस-२) १४ नोव्हेंबरला होणार आहे. या परीक्षेचे प्रवेशपत्र नुकतेच यूपीएससी मार्फत ऑनलाइन उपलब्ध करण्यात आले आहे.

यूपीएससी मार्फत वर्षातून दोन वेळा सीडीएसची परीक्षा घेण्यात येते. या परीक्षेच्या माध्यमातून इंडियन मिलिटरी अकॅडमी (आयएमए), नौदल अकॅडमी, हवाईदल अकॅडमी आणि ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमीसाठी (ओटीए) महिला व पुरुष उमेदवारांना निवडण्यात येते. तर सीडीएस-२ अंतर्गत ३०० हून अधिक जागांसाठी ही परीक्षा होणार असून उमेदवारांना हे प्रवेशपत्र १४ नोव्हेंबरपर्यंत डाऊनलोड करता येणार आहे. ही लेखी परीक्षा ३०० गुणांची असून लेखी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाच्या (एसएसबी) मुलाखतीसाठी निवडण्यात येईल. पुणे, मुंबई, नागपूर, आगरा, भोपाळ, चेन्नई, जोधपूर, दिल्ली अशा ७० हुन अधिक केंद्रांवर ही लेखी परीक्षा होणार आहे.

## उत्तर कोरियात क्षेपणास्त्रासाठी २४ हजार कोटींचा चुराडा

**जीनिव्हा :** उत्तर कोरियाचे हुकूमशहा किम जाँग उन यांनी दोन वर्षांत देशातील सीमा पूर्णपणे बंद केल्या आहेत. देशात कोरोना संसर्गाचा धोका निर्माण झाला आहे. संयुक्त राष्ट्राचे स्वतंत्र तपास अधिकारी थॉमस ओजिया क्विंटाना यांनी मानवी हक्क समितीला याबाबतची माहिती दिली. २.६० कोटी लोकसंख्येचा उत्तर कोरिया आशियातील गरीब देशांपैकी आहे. उत्तर कोरिया दरवर्षी क्षेपणास्त्रांवर सुमारे ३.२ अब्ज डॉलर (सुमारे २४ हजार कोटी रुपये) खर्च करते. देशात उपासमारीचे संकट असतानाही देशाचा खर्च क्षेपणास्त्रांवर केला जातो. उत्तर कोरियाबाबत संयुक्त राष्ट्राने एक स्वतंत्र अहवाल जाहीर केला आहे. त्यात उत्तर कोरियात खाद्यान्न संकटामुळे लोकांनी आत्महत्या करण्यास सुरुवात केल्याचे धक्कादायक वास्तव नमूद करण्यात आले आहे.

## रत्नागिरीत शिवसेनेला धक्का; नाराज पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

**रत्नागिरी :** राज्यात आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमिवर आधीच राजकीय वातावरण तापले असताना आता रत्नागिरीमध्ये शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. खरंतर, निवडणुकांचे वारे फिरल्यापासून अनेक पक्षांमध्ये इनकमिंग आणि आऊटगोईंग सुरू झाले आहे. अशात दापोलीत संदिप राजपुरे आणि नाराज पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेतील पदाचा राजीनामा दिला आहे. याचा भविष्यात शिवसेनेला नक्कीच फटका बसेल अशी चर्चा आहे. अधिक माहितीनुसार, रत्नागिरी जिल्ह्यात दापोली खेडमध्ये गेले कित्येक दिवस नाराज असलेल्या शिवसेना पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. तर हे पदाधिकारी राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. इतकेच नाहीतर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत प्रवेश निश्चित झाल्याचेही सांगण्यात येत आहे. राजीनामे देणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने शंकर कांगणे, उपजिल्हा प्रमुख, विकास जाधव, दत्ताराम गोठल आदींसह अनेकांचा समावेश आहे.

## भिवंडी मनपातील लाचखोर कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात

**भिवंडी :** पालिकेतील मृत कर्मचाऱ्याची प्रलंबित रक्कम वारस पत्नीस मिळवून देण्यासाठी चार हजार रुपयांची लाच घेताना पालिका भविष्य निर्वाह निधी कार्यालयातील प्रभारी कर्मचाऱ्यास रंगेहात पकडण्यात आले. ही कारवाई ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी आज मंगळवारी दुपारी केली. आनंद जगताप, असे एसीबीच्या जाळ्यात अडकलेल्या पालिका कर्मचाऱ्याचे नाव आहे. पालिकेचे कर्मचारी सिद्धार्थ मारुती घाडगे यांचा २९ मे २०२१ रोजी मृत्यू झाला. यानंतर, त्यांच्या पत्नी अस्मिता घाडगे यांनी भिवंडी पालिका भविष्य निर्वाह निधी कार्यालयात अर्ज करून पतीच्या नावे असलेली ग्रॅच्युईटी, भविष्य निर्वाह निधी, गट विमा व रजेचा पगार ही रक्कम मिळण्यासाठी अर्ज केला होता.

### शासनाचे विरोधात उभे राहण्याची गरज : प्रकाश पोहरे

# कोरोना : लसीकरणाची सक्ती संविधान विरोधी

■ नागरिकांच्या मूलभूत हक्कावर गदा ■ लसीकरणाविरोधात एल्गार पुकारण्याची गरज

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अकोला :** मुळातच फ्रॉड तसेच औषध कंपन्याचे शुद्ध षडयंत्र ठरलेल्या कोरोनाच्या लसीकरणासाठी राज्य प्रशासनाकडून केली जात असलेली सक्ती आता नागरिकांना मनस्ताप देणारी ठरत आहे. त्यांना संविधानाने दिलेले हक्क हिरावून घेण्याचा जोरकस प्रयत्न होत आहे. यासाठी विविध योजनांच्या लाभांना पुढे करून अनाहूत दबावगट निर्माण करत गरज नसताना लस घेण्यासाठी, किंवा ऊर्झे टेस्ट करून घेण्यासाठी का बाध्य केले जात आहे? असा प्रश्न नागरिक विचारात आहेत.

दरम्यान, प्रशासनाच्या लेखी त्यांच्याच आकडेवारीवरून कथीत कोरोना महामारी संपूष्टात आल्याचे स्पष्ट होत आहे; मग सक्तीचे लसीकरण कशासाठी? असा संतप्त सवाल नागरिक करीत आहेत. प्रशासनाने हे नियमबाह्य सक्तीचे लसीकरण थांबविले नाही तर प्रशासनाविरोधात एल्गार पुकारण्याचा इशारादेखील देण्यात आला आहे.

प्रशासनाने अलीकडेच स्वस्त धान्य वितरण प्रणालीत तसेच १८ वर्षावरील विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालयामध्ये प्रवेशाकरिता सक्तीच्या लसीकरणावर जोर देणारे निर्देश निर्गमित केले. त्यामुळे गोरगरीब व शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच त्यांच्या पालकांत संताप व्यक्त होत आहे. लसीकरणाचे दुष्परिणाम समोर येत असल्यानंतरही प्रशासनाकडून लस घेण्याची होत असलेली सक्ती त्यांच्या बौद्धिक स्तरावर प्रश्नचिन्ह उभे करणारी ठरत आहे. केंद्र सरकारचे सक्तीच्या लसीकरणाबाबत कोणतेच आदेश नाहीत; मात्र राज्य प्रशासन कमिशनच्या टक्केवारीकरिता लसीकरणाची ही सक्ती करत असल्याचे आता लपून राहिले नसल्याच्या संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहेत. अनेक राज्यातील उच्च न्यायालयानी या विरोधात निकाल दिले आहेत.

### लसीकरणाचे दुष्परिणाम

चुकीचे कोरोना उपचार घेतलेल्या तसेच कोरोना प्रतिबंधक लसीकरणाचे दुष्परिणाम आता समोर येत आहेत. लसीकरणामुळे मृत्यू, लकवा, अपंगत्व, ब्लड क्लॉटिंग, नपुंसकता आदी व्याधी जडत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. कोरोनावर दिलेल्या अनेक औषधींवर नंतर बंदी घालण्यात आली. या औषधोपचाराने ब्लॅक फंगसच्या आजाराचे रुग्ण वाढून, अनेकांचा त्यात मृत्यूही झाला. दिल्या जात असलेल्या लसींची चाचणी झालेली नाही, मग अशा विनाचाचणीच्या लसीचे डोस देणे कितपत योग्य असू शकतात? असा प्रश्नही नागरिकांतून उभा केला जात आहे.

### उद्या पोहेरे यांची शाळा, महाविद्यालयांना भेट

सक्तीच्या लसीकरणाविरोधात जागृत पालक व विद्यार्थ्यांनी आज दिनांक २७ नोव्हेंबरमध्ये संपर्क साधल्यास गुरुवार, २७ ऑक्टोबर रोजी शेतकरी नेते प्रकाश पोहेरे स्वतः जातीने शाळा, महाविद्यालयांना भेट देऊन विद्यार्थी व पालकांना साथ देण्यासाठी येऊ शकतात. तसेच मुख्याध्यापक, प्राचार्य यांच्यासोबत संवाद साधून या सक्तीच्या लसीकरणावरणाच्या विरोधात उभे राहण्याची गळ घालणार आहेत. विद्यार्थी, पालकांनी जागरूकतेने या आंदोलनात सहभागी होऊन सक्तीच्या लसीकरणाचा डाव हाणून पाडावा, असे पोहरे यांनी आवाहन केले आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्राचा चुकीचा अर्थ

स्वस्त धान्य वितरण प्रणालीबाबत जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या पत्रात लसीकरण न झालेल्यांना धान्य पुरवठा थांबविण्याबाबत कुठेही उल्लेख नाही; परंतु, प्रशासनातील दुसरी फळी मात्र या पत्राच्या मजकुरातला आपल्या सोयीचा अर्थ काढून जिल्हाधिकारी यांच्या पत्रालाही गुंडाळून ठेवत असल्याचा आरोपही नागरिकांतून केला जात आहे. लसीकरणाशिवाय शाळा, महाविद्यालयांत विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाऊ नये, असा दुसरा अफलातून निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. वस्तुतः १८ वर्षपर्यंतच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना कोरोना प्रतिबंधक लस देता येत नाही. १८ वर्षावरील विद्यार्थ्यांना लस अनिवार्य नसून, ती ऐच्छिक असल्याचे केंद्र शासनाकडूनच वेळोवेळी जाहीर करण्यात आले आहे. असे असताना शाळा, महाविद्यालयांमध्ये प्रवेशाकरिता लसीचे दोन्ही डोस अनिवार्य करणे ही राज्यातील कुणा बिनडोकाच्या डोक्यातील उपज आहे? असा संतप्त सवाल नागरिक विचारीत आहेत.

### दुष्परिणामाबाबत अनेक तज्ज्ञांचे व्हिडिओ उपलब्ध

कोरोना हे षडयंत्र असून, दहशत पसरविण्यासाठी फार्मा माफिया द्वारे जागतिकस्तरावरून या अस्त्राचा वापर केला जात असल्याचे देश, विदेशातील अनेक तज्ज्ञांचे व्हिडीओ, यू-ट्यूब, व्हॉटसअप, टेलीग्रामवर उपलब्ध आहेत. टेलीग्राम एप वर भारत जागो अभियान' व 'कोरोना षडयंत्र' त्यांनी सबळ पुराव्यासह कोरोना फ्रॉड असल्याचे म्हटले आहे. चुकीच्या औषधी देऊन आणि रेमडीसीवर सारखे घातक इंजेक्शन देऊन लोकांना मारून आणि त्याद्वारे भीती पसरवून आपले उखळ पांढरे करण्यासाठी औषध निर्मात्या कंपन्यांनी कोरोनाचे बुजगावणे उभे केले, असे तज्ज्ञांनी आपल्या व्हिडिओ क्लिपच्या माध्यमातून स्पष्ट केले आहे. जिज्ञासू हे विविध व्हिडिओ पाहू शकतात.

### तर संपर्क साधा

रेशन घेताना किंवा शाळा कॉलेज मध्ये प्रवेश घेतांना लसीकरणाची सक्ती करण्यात येत असेल तर या लसीपासून होणाऱ्या संभाव्य नुकसानीची जबाबदारी स्वीकारणारा मजकूर संबंधित यंत्रणा, घटकांकडून लिहून घ्या. यामध्ये काही अडचण आल्यास किंवा यंत्रणेकडून टाळाटाळ होत असल्यास ९५५२५ १०७८० आणि ९५५२५ १०७८१ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन सुद्धा पोहरे यांनी केले आहे.

### विरोधात एल्गार पुकारावा - प्रकाश पोहरे

कोरोना बागुलबुवाच्या माध्यमातून भीती पसरवून औषध निर्मात्या कंपन्यांनी



कोट्यवधींची माया जमवून आपले उखळ पांढरे केले. यामध्ये शासन, प्रशासनदेखील 'वाटेकरी' आहे. त्यामुळेच विविध क्लृप्त्या वापरून लसीकरणाची सक्ती केली जात आहे. उत्तर प्रदेश, गुजरातमध्ये लसीकरण केल्यानंतरच दुसरी लाट आली आणि त्यात लाखो लोक मृत्युमुखी पडले हे गंगेत वाहणाऱ्या प्रेतांनी सिद्ध झाले आहे. अधिकाधिक लसीचे डोज देऊन कमिशनमधील आपला 'वाटा' फुगविण्याच्या सर्वच राजकीय पक्ष व फार्मा लॉबी प्रयत्नात आहेत. एकीकडे लसीकरण ऐच्छिक असल्याचे केंद्र शासनाकडून सांगितले जात असले तरी राज्यातील गोम वेगळीच आहे हे नागरिकांनी लक्ष्यात घेऊन सक्तीच्या लसीकरणाविरुद्ध एल्गार पुकारावा. स्वस्त धान्य दुकानावर एकत्रित होऊन प्रशासनाचे डाव हाणून पाडावेत असे आवाहन पोहरे यांनी केले आहे. शाळा, महाविालयात प्रवेश नाकारला जात असेल तर विद्यार्थी, पालकांनी त्याला विरोध करावा. तर संबंधित शाळा मुख्याध्यापक, महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ खेळणाऱ्या शासकीय कृतीचा निषेध नोंदवून प्रशासनाच्या या सक्तीच्या लसीकरणाचा डाव हाणून पाडावा. असे आवाहन कोरोना षडयंत्राविरोधात आघाडी उघडलेल्या प्रकाश पोहरे यांनी केले आहे.

## हल्ली बायका पण असा चोमडेपणा करत नाहीत!

### पत्रकार परिषद : क्रांती रेडकरांचा मलिकांना टोला

**मुंबई :** एनसीबीचे अधिकारी समीर वानखेडे यांची पत्नी आणि अभिनेत्री क्रांती रेडकरने आज मुंबईमध्ये पत्रकार परिषद घेतली. यावेळी क्रांतीने अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांच्याकडून मागील काही दिवसांपासून सुरू असणारे आरोप आणि ट्विटरवरील पोस्टवर आक्षेप नोंदवला. तसेच तिने हा सारा प्रकार म्हणजे बायकांसारखा चोमडेपणा वाटतोय, असा टोलाही अप्रत्यक्षपणे लगावला आहे.

ट्विटरवरून काल नबाव मलिक यांनी समीरवर वानखेडेंचा जन्म दाखला आणि पहिल्या लग्नाचा फोटो पोस्ट केला होता. मात्र, यावरून क्रांतीने कालच सोशल मीडियावरून स्पष्टीकरण दिले होते. आज पत्रकार परिषदेमध्ये यासंदर्भात प्रश्न विचारण्यात आला असता क्रांती संतापली. आज काल बायका पण असे वागत नाहीत. हे किचनमधील पॉलिटिक्स, चोमडेपणा केल्यासारखे आहे. एक ट्विटरसारखे माध्यम आहे तर उद्या कोणीही उठून काहीही लिहील. आम्ही तुमचा सन्मान करतो तर तुम्ही तसे वागा, असा खोचक सल्ला क्रांतीने नबाव मलिक यांना दिला. समीर तिथून हटले तर कोणाचा फायदा होणार हे शोधले पाहिजे. ज्या पद्धतीने समीर यांच्याबद्दलची माहिती काढली जातेय त्यासाठी पैसे लागतात. हे काही ड्रग्ज पेडलर्सचे वगैरे काम नाही. यासाठी प्रायव्हेट डिटेक्टीव्ह वगैरे लागतात. एवढे पैसे टाकतायत तर काहीतरी हेतू असणार, अशी शंकाही क्रांतीने बोलून दाखवली. तर समीर यांची बहीण जास्मिन वानखेडे यांनी या प्रकरणामध्ये पेड लॉबी असल्याचे समजते असे सांगितले.


